मग एका शनिवारी संध्याकाळी रामभाऊ घरी आले. जवळजवळ चार तास मी त्यांना वेगवेगळ्या भाषेत केलेली माझी गाणी ऐकविली. गाणी ऐकून रामभाऊ म्हणाले, 'खळे, आता एक नक्की झाले की, या चित्रपटाचे संगीत तुम्हीच देणार. तुमचे संगीत सध्याच्या प्रस्थापित संगीतापेक्षा वेगळे आहे. तुम्ही काळजी करू नका. माडगूळकरांकडून गाणी आणण्याची जबाबदारी माझी.' मग काही दिवसांनी रामभाऊंनी मला बाबूराव पै यांच्या कॅंडल रोडवरील स्टुडिओत बोलावून माडगूळकरांची चार गाणी दिली. त्या गाण्यात 'गोरी गोरी पान, फुलासारखी छान' व 'एका तळ्यात होती- बदके पिले सुरेख' या दोन गाण्यांव्यतिरिक्त दोन अभंगही होते. ते हातात पडल्यावर मला असे झाले- कधी मी त्यांना कंपोझ करतो. मी एका रात्रीत चारही गाणी बसविली. खरं सांगू का, प्रत्येक शब्दाला जसा एक अर्थ असतो तसाच त्याचा एक सूरही असतो. शब्द समोर आला की त्याला शोभणारा सूरही आपोआप सुचत जातो. माझेही काहीसे तसेच झाले. गदिमांचे प्रासादिक काव्य समोर आल्यावर भराभर चाल सुचत गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे अकरा वाजता राम गबाले आले. ते म्हणाले, 'इथे जवळच काही कामासाठी आलो होतो. विचार केला- तुम्हाला काही सुचलं असेल तर ऐकावे.' मी त्यांना सांगितले, 'गाणी तयार आहेत.' ते ऐकून ते चकितच झाले. ते म्हणाले, 'मला ती ऐकायची नाहीत. तुम्ही असे घाईघाईने काम करू नका. हवा तेवढा वेळ घ्या.' यावर मी त्यांना सांगितले, 'रामभाऊ, ज्या चाली केल्यात त्या ऐकून तर पाहा. तुम्हाला पसंत पडल्या नाहीत तर मी त्या बदलेन.' ते म्हणाले, 'ठीक आहे. काढा पेटी.' चाली ऐकविल्यावर मी त्यांना विचारले, 'चाली बदलायच्या का ?' त्यावर ते म्हणाले, 'खळे, तुम्ही मला संगीताच्या बाबतीत जेवढा अज्ञानी समजता, तेवढा मी नाही. तुमच्या चाली अप्रतिम आहेत व त्याच आपण कायम ठेवायच्या.'

या घटनेनंतर चार-पाच दिवसांनी रामभाऊंचा साहाय्यक निरोप घेऊन आला की, रामभाऊंच्या ऑफिसमध्ये गदिमा येत आहेत व त्यांच्याशी भेट घालून देण्यासाठी मला तेथे बोलाविले आहे. मी तेथे गेल्यावर काही वेळाने गदिमा आले. रामभाऊंनी आमची ओळख करून दिली. मला पाहताच गदिमा हिंदीत म्हणाले, 'आपके पास कोई जादू है क्या ?' मी त्यांना विचारले, 'आपणास असे का वाटते ?' त्यावर ते म्हणाले, 'पहिल्यांदा ते पोतनीस तुमचे कौतुक करीत होते. आता हा रामदेखील तुमचे कौतुक करीत सुटलाय.' मी ते ऐकून गदिमांना म्हटले, 'आपणही मी केलेली गाणी ऐकावीत अशी माझी इच्छा आहे.' यावर ते म्हणाले, 'मला संगीतातील काय कळतंय ?' ते